महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. मु.अ. (वा)/लेखा /विद्युत शुल्क /०७/** No 21329 **दिनांक :** 26 JUL 2012

**परिपत्रक** - ३५४

**विषय :-** सामुहिक प्रोत्साहन योजना -२००१ आणि २००७ अंतर्गत विद्युत शुल्क माफीबाबत.

**संदर्भ :-** मु.अ.(वि//का-५ (७)/२३५७/सन २०११ दिनांक १२.०७.२०१२.

---

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र शासन उद्योग विभागाने सामुहिक प्रोत्साहन योजना २००१ आणि २००७ अंतर्गत विविध उद्योगांना विद्युत शुल्क माफीची सवलत लागू करण्यात आलेली आहे.

संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने मुख्य अभियंता (विद्युत) मुंबई यांनी या योजनेअंतर्गत विद्युत शुल्क माफ करण्यात आलेल्या सर्व उद्योगांचा आपण नियमितपणे आढावा घेऊन विद्युत शुल्क माफी कालावधी संपल्यानंतर संबंधित उद्योगाकडून वीज शुल्क वसुल करण्यात यावा अशा प्रकारच्या मार्गदर्शनपर सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अंतर्गत विद्युत शुल्क माफीबाबत मुख्य अभियंता (विद्युत) यांचेकडून सुचना प्राप्त झाल्याशिवाय संबंधित उद्योगास विद्युत शुल्क माफ करण्यात येऊ नये असेहि संदर्भिय पत्रात नमुद केलेले आहे.

या सुचनांची काटेकोरपणे आपल्या पातळीवर अंमलबजावणी होण्यासाठी दक्षता घेण्यात यावी.

सहपत्र : संदर्भित पत्राची प्रत.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
प्रादेशिक कार्यकारी संचालक -१/२/३, महावितरण, कल्याण/पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना :-**
सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ, महावितरण.

**प्रत रवाना :-**
१) सर्व अधिक्षक अभियंता, सं व सु मंडळ, महावितरण.
२) सर्व कार्यकारी अभियंता, सं व सु विभाग, महावितरण.
३) सर्व उपकार्यकारी अभियंता / सहाय्यक अभियंता, सं व सु उपविभाग, महावितरण.

D:\SKG\Acctt (More)\Marathi\Samuhik Protsahan Yojana_25.7.12.doc

| महाराष्ट्र शासन<br>मुख्य अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय<br>सा.बां.विभाग, महाराष्ट्र शासन,<br>बांधकाम भवन, ३रा मजला, मर्झबान रोड,<br>फोर्ट, मुंबई ४०० ००१ | |
|---|---|
| Website :www.mahapwd.com<br>Email - elmumbai.ce@mahapwd.com | Telehpone : (022) 22013415/22013416/<br>22013417 Fax : (022) 22016900 |
| जा.क्र.मु.अ.(वि)/का-५(७)/२३५६/सन २०११ | दिनांक : |


आ. क्र. 3810 दिनांक 20/07/2012

प्रति

मुख्य अभियंता (वाणिज्य)
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,
प्रकाशगड बांद्रा मुबंई

AM (M)
P/s. Circulate letter to field offices
24/7/12

प्रति,

अधिक्षक अभियता (सर्व)
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,

प्रति

मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.
आरएनए कॉर्पोरेट पार्क, जुने कला मंदिर,
जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बांद्रा (पूर्व)
मुंबई-५१

प्रति

मे.टाटा पॉवर कंपनी लिमीटेड,
कस्टमर मॅनेजमेट डिर्पाटमेट, धारावी रिसीव्हींग स्टेशन,
शालीमार इंडस्ट्रियल इस्टेटच्या जवळ, माटुंगा, मुंबई-४०० ०१९

प्रति

मे.जनरल मॅनेजर
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम
बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१

विषय :- सामुहिक प्रोत्साहन योजना-२००१ आणि २००७ अंतर्गत विद्युत शुल्क माफीबाबत.

संदर्भ :- १) शासनाचे पत्र क्र. इएलडी२००३/सीज-३०/ऊर्जा-२ दिनांक२५/०२/२००३
२) शासनाचे पत्र क्र. इएलडी२००८/प्रक्र२७६/ऊर्जा-१ दिनांक १७/११/२००६

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र शासन उद्योग विभागाने सामुहिक प्रोत्साहन योजना २००१ व सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अतंर्गत विविक्षित उद्योगाना विद्युत शुल्क माफीची सवलत लागु करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार विविध शासकीय संस्थाना देण्यात आले होते व त्यानुसार संबधिताचे पात्रता प्रमाणपत्र दिल्यानंतर परवानाधारक कंपनीने संबधिताना विद्युत शुलक माफ करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

संदर्भ क्र.२ नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अन्वये विद्युत शुल्क माफीचे पात्रता प्रमाणपत्र निर्गमित केल्यानंतर त्याची प्रत संबधितानी मुख्य अभियंता (विद्युत) यांना पाठविण्याबाबत सुचित केले अहे. व विद्युत शुल्क माफीबाबत

मुख्य अभियंता (विद्युत) यांनी संबधित परवानाधारक कंपनीस व विद्युत निरिक्षकांस कळविल्यानंतर संबधित ग्राहकास विज शुल्क माफी देणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

विज शुल्क माफ करण्यात आलेल्या सर्व उद्योगांचा आपण नियमितपणे आढावा घेवून विद्युत शुल्क माफी कालावधी संपल्यानंतर संबधित उद्योगाकडून वीज शुल्क वसुल करण्यात यावा.
सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अतंर्गत विद्युत शुल्क माफीबाबत मुख्य अभियंता (विद्युत) यांचेकडून सुचना आल्याशिवाय संबधित उद्योगास विज शुल्क माफ करण्यात येवू नये.

(सु.तु.वलेकर)
मुख्य अभियंता (विद्युत)

प्रत -- विद्युत निरिक्षक मुबंई /ठाणे/पुणे/नाशिक/नागपुर/औरंगाबाद/अमरावती/कोल्हापुर/ सर्व विद्युत निरिक्षकांनी, बिलिंग सेटंर तपासणी करताना विद्युत शुल्क माफी करण्यात आलेल्या उद्योगांचे पात्रता प्रमाणपत्राची तपासणी करण्यात यावी पात्रता प्रमाणपत्राशिवाय विद्युत शुल्क माफी देण्यात येत असल्यास विद्युत शुल्क थकबाकी व त्यावरील व्याजासह वसुल करण्यात यावा